# 'मराठी विश्व- क्लब ५५'ची वार्षिक हॉलिडे पार्टी
## 'झूम झम के नाचे आज, गाये आज'

**- राजन् गडकरी** (माह्वाह्, न्यू जर्सी)

सालाबाद प्रमाणे ह्याही वर्षी न्यू जर्सीतील "मराठी विश्व क्लब ५५" च्या वार्षिक हॉलिडे पार्टीची वेळ आली. कार्यकारिणीचे सदस्य एकमेकांशी बोलायला लागले आणि मग मीटींग ठरली. शकुन पानसे यांनी सर्वांना आमंत्रणं पाठवली. एक मोठा फरक. मीटींग होती झूमवर. नेहमीप्रमाणे **वेगवेगळे पर्याय, सूचना पुढे आल्या – अगदी wine and cheese पासून पेशवाई बेतापर्यंत! मग एक अधिकारवाणीचा आवाज आला-** अलका पै यांचा. (कार्यकारिणीतली health care specialist ). "काही झालंतरी आपल्याला कोविडचे नियम पाळावेच लागतील". मग सुहास पै नव्हे तर सर्व सभासदांनी तो ठराव मान्य केला. आता सर्व आयोजनाची चक्रं फिरायला लागली.

नेहमी स्वत:च्या ५२ कुटुंबियांना "झूम"वर एकत्र भेटण्याचे आयोजन करणाऱ्या शकुनने मराठी विश्व क्लब ५५च्या कुटुंबियांसाठी झूमवर पार्टीची योजना करायची जबाबदारी घेतली. सर्व सभासदांना शिस्तबद्ध वातावरणात एकत्र आणून शकुननं हा कार्यक्रम आखला आणि मीनानं नेहमीप्रमाणे सर्वांचं मनापासून स्वागत केलं. मग अलकानं पूर्वीच जाहीर केलेल्या raffle च्या विजेत्यांची नांवे घोषित केली- सौ. चित्रा लेले व श्री. माधव फडके!

त्यानंतर आले प्रशांत कोल्हटकर आणि सौ. विद्या जोशी, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे (BMM)/बृ.म. मंडळ) पदाधिकारी. त्यांनी मराठी विश्व-क्लब ५५ च्या सदस्यांनी आतापर्यंतच्या बृ. म. मंडळाला दिलेल्या सहकार्याचा आदर करून २०२२ सालच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी आग्रहाचं आमंत्रण दिलं.

नेहमी आपल्या पिढीचं मनोरंजन करणाऱ्या सुहासनी पुढच्या पिढीला आमंत्रण द्यायचं ठरवलं. हा एक आगळाच कार्यक्रम सादर करायची जबाबदारी सौ. राजेश्री कुलकर्णींनी घेतली. हे काम खूपच कठिण होतं. नृत्य, संगीत, साहित्य ह्या सर्व ललितकलात नैपुण्य मिळवलेले कलावंत शोधायचे आणि त्यांच्याकडून आपल्या पिढीचं मनोरंजन करून घ्यायचं. पण ह्या प्रयत्नात सुहास व राजेश्री खूपच यशस्वी ठरली. हा कार्यक्रम यूट्युबवर सादर केला.

राजेश्रीने मराठी विश्व- क्लब ५५ ची अमराठी श्रोत्यांशी इंग्लिश भाषेत ओळख करून दिली, कारण ह्या सर्व तरुण कलावंतांचे काही चाहते अमराठीदेखील आहेत. गेल्या १५ वर्षातील कार्याचा आढावा घेतांना करमणुकीच्या व्यतिरिक्त इतरही educational activities, slides च्या माध्यमातून सादर केले. सर्व कलावंतांना सादर करताना राजेश्रीने त्यांचा शास्त्रोक्त व शैक्षणिक अभ्यासाचा प्रवास, स्वत:च्या क्षेत्रात कमवलेलं यश आणि सध्याचे व्यवसाय याबद्दलही माहिती सांगितली.

प्रथम रोहित गिजरेनं सादर केलं एक नृत्य, नटरंग सिनेमातली अजय-अतुलच्या संगीतावर आधारीत, गाजलेली लावणी – "आता जाऊं द्यानं घरी! वाजले की बारा" आणि त्यात होता एक सुप्रसिध्द पाश्चिमात्य प्रसंग- Cinderella's dance and the lost shoe. Excellent fusion होतं ते!

त्यानंतर आला नील नाडकर्णी! तो तर आम्हा सर्वांना घेऊन गेला १९६० मध्ये. त्याने कोहिनूर सिनेमातलं "मधु बनमे राधिका" हे गाणं पेश केलं. आमचा nostalgic स्वभाव बहरला. मोहम्मद रफीच्या खूपच आठवणी जाग्या झाल्या. त्याच्या गाण्यात काही हरकती रफीच्या काही नीलच्या, त्याने तराणा सुद्धा तितक्याच कुशलतेनं सादर केला. 'सागरा प्राण तळमळला'. सर्व मराठी मनांना भारावून टाकणारं हे गाणंही नीलनं तितक्याच तन्मयतेनं सादर केलं.

आता निकिता बावीसकरने ठरवलं, की अगदी क्लासिकल कथ्थक पेश करायचं. पण हेतू तोच! समोरच्या मराठी मनाला रिझवायचं. तिनं संत तुकारामांचा अत्यंत संथ अभंग घेतला ' सुंदर ते ध्यान'. तिचा प्रत्येक हावभाव, मुद्रा, पाऊल आम्हाला अलगद विठ्ठलाच्या मंदिरात घेऊन गेले. शेवटी सादर केलेला कलावती रागातला तराणा – तालबद्ध आणि लयबद्ध होता!

मग आला अक्षय आणावकर, उत्तर अमेरिकेत आणि भारताल गाजलेला एक गुणी गायक. त्याने अजय-अतुलचं प्रसिद्ध-'एकदंताय वक्रतुंडाय' हे गणेशस्तवन सादर केलं हे महाराष्ट्रातलं भजन अजय़-अतुल यांनी भारतभर पोचवलं आणि आज अक्षयचं तेच गाणं आम्हालाही तितकंच भावलं. त्याचं दुसरं गाणं तर फारच लोकप्रिय! दिल ही तो है सिनेमातलं 'लागा चुनरीमे दाग'. अक्षयची शास्त्रोक्त संगीतातली कुशलता जाणवत होती. शेवटचा तराणा पण खूपच सहजतेनं त्यानं सादर केला.

मराठी विश्व- क्लब ५५ च्या सदस्यांपैकी साहित्याची आवड असलेल्यांना तेजू बांबुलकरच्या कथा फारच आवडतात. आज तिनं एक आगळीच प्रेमकथा आम्हाला ऐकवली. Jonathan and Mary Ann ची. ५८ वर्षं झालेली लग्नाला. नि आता तिला अल्झायमर झालेला. ती तिच्या भूतकाळात रमलेली आणि हा वर्तमानात. तितकंच प्रेम पण साठ वर्षांची दरी आहेमध्ये. तेजूनं हे

सारे हिंदोळे फार कुशलतेनं दाखवले. कधी जोनाथनची दया येत नाही. कौतुकच वाटतं. शेवटी तर असा कलट दिलाय, की ते सत्य असूनही आपल्या चेहऱ्यावर थोडंसं हंसू येतं.

राजश्रीने मग आमची ओळख करून दिली ती प्रियांका कसबेकरशी. तिनं सुद्धा तुकारामांचाच अभंग घेतला होता ‘बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल’. हें गाणं ऐकताना राजेश्रीच्याच शब्दात सागायचं तर विठ्ठलाच्या वारीत सामील झाल्यासारखं वाटत होतं. तिचं दुसरं गाणं होतं ‘बीती जायी सारी रैना’. हे गुलजारचं गाणं लताची आठवण करून देत होतं.

कार्यक्रमाची सांगता झाली, रोहित गिजरे आणि त्याची पत्नी आलिया इस्लाम यांनी सादर केलेल्या ‘सलामे इष्क’ या नृत्याने ! त्यांचे सादरीकरण पहाताना आपली पुढची पिढी किती प्रोफेशनल झाली आहे ह्याची जाणीव झाली.

ह्या सर्व कलावंतात काही गोष्टी प्रकर्षानं जाणवल्या. स्वतःच्या कलेचा त्यांचा अभ्यास शास्त्रोक्त आणि खोलवर होता. त्यांच्या सादरीकरणावर पाश्चिमात्य संस्कारही होते. पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यांना त्यांच्या ऑडियन्सची जाणीव होती. आम्ही सारे साठीच्या पलिकडले मराठी आहोत आणि आम्हाला विशीत जे संगीत, नाट्य, साहित्य, नृत्य आवडलं ते अजूनही आम्ही enjoy करतो even in a different form. ही फार मोठी कौतुकाची गोष्ट आहे. ह्या आमच्या भावना, त्यांचं कौतुक, त्यांचा अभिमान आणि त्यांचे आभार त्यांच्यापर्यंत क्लब ५५ची समिती पोहोचवीलच.

हा कार्यक्रम सादर करण्यात सुहास आणि राजश्रीचा सिंहाचा वाटा. सुहासने ह्या सर्व कलावंतांना एकत्र आणून सादरीकरणाच्या व्हिडीओ क्लिप्स तयार केल्या. राजश्रीच्या कार्याबद्दल लिहायला योग्य शब्द मिळणं कठिण. ह्या मुलांच्या कलेचा प्रवास ती जगली. त्यांच्या आविष्काराचा तिनं अभ्यास केला. त्यांच्याबद्दल वाटणारा तिचा अभिमान, कौतुक स्पष्ट दिसत होते. आणि मग ते आपल्याला सादर करायला तिनं योग्य शब्द वेचले. श्री. प्रशांत गिजरेंनी एडिटिंगची अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली. सौ. नीलम पडते ह्यांनी प्रसिध्दीसाठी एक कलात्मक पत्रक तयार केल्याबद्दल त्यांचे आभार.

मराठी विश्व- क्लब५५ च्या सर्व कार्यकारिणीच्या सभासदांचे - सौ. शोभा व श्री. नंदा पडते, सौ. अलका व श्री. सुहास पै, सौ. मोना व श्री. जगदीश वासुदेव, सौ. मीना व श्री. अविनाश देशपांडे, सौ. शकुन व श्री. रामानंद पानसे ह्यांचे आभार मानणं नेहमीच कठिण जातं. कारण ते आहेत म्हणून हा कार्यक्रम आहे आणि मराठी विश्व- क्लब ५५ आहे.

पुढच्या वर्षाची वाट आतापासूनच पहात आहोत. पण ह्या कोरोना महामारीमध्येसुद्धा आपण सारे एकत्र येऊन असा कार्यक्रम उपभोगू शकतो हे दाखवून दिल्याबद्दल क्लब५५च्या कमिटीचे खास आभार.

***

# चाफा फुलला!

**- शुभदा गतारे-कोरे** (ऑस्टिन, टेक्सास)

“चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी, काही केल्या फुलेना..” कवी बी यांच्या या लोकप्रिय काव्यातील प्रेयसी जरी तिच्या रुसलेल्या प्रियकराला उद्देशून गात असली, तरी मी मात्र हे गाणे गेले काही महिने माझ्या बागेतल्या खऱ्याखुऱ्या चाफ्याला उद्देशून गुणगुणत होते.

त्याचे झाले असे, की मला फुलांची व बागेचीही दांडगी हौस, त्यामुळे जागा कितीही असो, शक्य असतील तेवढी फुलझाडे मी लावायचीच. आता तर जागा भरपूर आहे त्यामुळे बरीच फुलझाडे लावली. इथे कितीही सुंदर फुलझाडे उपलब्ध असली, तरी मोगरा, जाई-जुई, निशिगंध, पारिजातक, देवचाफा यांचा हव्यास असतोच. कोणताही भपकेबाजपणा नाही तरीही आपल्या सुवासाने मनाला भुरळ पाडणारी अशी ही फुले. त्या प्रत्येकाशी जोडलेल्या कितीतरी गोड आठवणी मनाच्या कोपऱ्यात जपलेल्या आणि म्हणूनच की काय, माहेरची वाटतात जणू! यातली काही फुलझाडे सहज मिळाली, पण देवचाफा कोठे मिळाला नाही. कधीच दिसला नाही तो इथल्या लोकल नर्सरीत. त्यादिवशी मात्र मला अचानक अनपेक्षितपणे दिसला. आधी विश्वासच बसेना पण जवळ जाऊन खात्री केली तर चाफाच होता तो! मन एकदम हरखून गेले. रंगाचे लेबल नसल्याने, देवचाफाच निघावा अशी मनोमन इच्छा धरून एक छानसं रोपटे घेऊन आले. उत्साहाने लगेच नवीन कुंडीत वृक्षारोपणही करून टाकले. रोज सकाळी उठून नवीन काय दिसते का ते मी उत्साहाने बघायचे. रोप छान वाढत होते. बघतां बघतां फॉल आला व हळूहळू त्याची पाने गळू लागली. नुसता सरळसोट निष्पर्ण बुंधा फारच विचित्र भासू लागला. कॅरोलिना रेन पक्षांचे ते आवडते ठिकाण झाले. त्यावर बसून ते रोज साद घालू लागले. थंडीचे दोन तीन महिने घरातल्या उबेत विसावून, मार्च उजाडताच परत त्याची रवानगी बाहेर झाली. वसंताची चाहूल लागताच बघतां बघतां बुंध्यावर नवीन रसरशीत पालवी दिसू लागली. माझे मनही मोहरून आले. मी त्याची यथायोग्य काळजी घेत होते. खतपाणी मिळाल्यामुळे झाड छान वाढत होते. पण फुलांचा मागमूस नव्हता. उन्हाळा

गेला, थंडीही गेली, पानगळ झाली, परत तेच निर्सगाचे चक्र! पुढच्या वर्षी वसंताची चाहूल लागताच परत नवीन पालवी आली. आम्ही त्या रोपाचे मोठ्या कुंडीत स्थलांतर केले, तसे ते रोप झपाट्याने वाढू लागले. पानांचा आकारही वाढू लागला. त्याच्या मोठाल्या निमुळत्या होत जाणाऱ्या हिरव्यागार पानांची शोभा काही औरच होती. लवकरच नवीन पानांच्या झुबक्यातून चार नव्या फांद्या दिसू लागल्या. त्याचा पसारा वाढू लागला. फुले नसली तरी हिरव्या पर्णसंभाराने डवरलेले झाड अगदी दिमाखदार दिसू लागले. दोन वर्षे वाट पाहिल्यानंतर आता फुलांसाठी मन आसुसले होते. त्याला नियमित खतपाणी घालूनही, भरपूर सूर्यप्रकाश मिळूनही फुले येण्याचे कोणतेच लक्षण दिसेना, तेव्हा मात्र मला धीर धरवेना. याला कशाची बरं खंत असावी असा मला प्रश्न पडला. रोज त्याला पाहिले कि नकळत "चाफा बोलेना…"च्या ओळी ओठावर येऊ लागल्या.

मग मी ठरवले, आता आपण सर जगदीश चंद्र बोसांनी लावलेला शोध पडताळून पहायचे. मी चाफ्याशी चक्क बोलायला सुरूवात केली. त्याची प्रेमाने रोज चौकशी करू लागले. त्याच्या फांद्यांवरून प्रेमाने हात फिरवू लागले. मनातील सारी गुपितं त्याच्याजवळ उघडू लागले. तोही शांतपणे, अजिबात जज्मेंटल न होता मला ऐकून घेत असे. आमची छान मैत्री जमली. रोज सकाळी उठल्यावर आधी पक्षांना खाद्य व पाणी ठेवले, की चाफ्याला भेटून त्याची विचारपूस करून मगच बाकीचा दिनक्रम सुरू करायचा हा नित्यनियमच बनला. माझी सुखदु:ख त्याच्याशी शेअर करायला मलाही आवडू लागले. मन मोकळे करायला हक्काचे कोणी मिळाल्यामुळे की काय मला छान वाटायचे. असेच काही आठवडे उलटले. श्रावण संपत आला होता नि एक दिवस सकाळी नवीन पालवीखाली काहीतरी वेगळे दिसतंय असे वाटले, म्हणून पाहिले तर काय सांगू, अहो कळ्याच होत्या त्या! नीट पाहिल्यावर तर खात्रीच पटली. मला अगदी हर्षवायूच झाला. रंग मात्र गुलाबीच दिसत होता. दिवसागणिक कळ्या वाढू लागल्या. मी अगदी अधिरतेने त्यांना रोज न्याहाळत होते. हळूहळू कळ्यांचा रंग थोडा पांढरट दिसू लागला व परत एकदा मनातला मोर नाचू लागला, बहुतेक देवचाफाच!

खूपच सुंदर होती ती संध्याकाळ. दाटलेल्या राखाडी-गुलाबी ढगांतून डोकावणाऱ्या मावळतीच्या सूर्याच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणाऱ्या चाफ्याच्या अर्धोन्मीलित कळ्या, किती नेत्रसुखद दृश्य होते ते! उद्या फुले उमलणार या कल्पनेने झोपही नाही लागली. पहाटेपासूनच पावसानं हजेरी लावली होती. संकष्टीचा दिवस होता तो. पटकन उठून पावसाची तमा न बाळगता मी चाफ्याला भेटायला गेले तर दोन टपोरी फुले उमलली होती. खरच माझा चाफा फुलला होता! पाच पांढऱ्या पाकळ्या,मध्यभागी पिवळसर झाक व त्यावर पडलेले पावसाचे थेंब, देवचाफ्याचे सात्विक सौंदर्य अजूनच खुलवत होते.







दीर्घ प्रतिक्षेनंतर आलेल्या पावसाने सुखावलेला निसर्ग, फुललेला चाफा व त्याचा मनमोहक मंद सुगंध, अहाहा! आज माझ्या मनातही श्रावण फुलला होता. अजूनही रोज चाफ्याला फुले येतात. मी तर फक्त थोडी आपुलकी दाखवली, पण चाफ्याने तर आनंदाची जणू लयलूटच केली! नकळत सुखाचे अजून एक गुपित उलगडले गेले.

***

## पसायदानाचा शतशब्दथरार!

**- डॉ. प्रियदर्शन मनोहर** (पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया)

आज उगीचच मनात आलं की कशाला आपण इतकं भरमसाठ लिहितो? जे आपल्याला सांगायचं आहे ते किती कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त समर्थपणे आपल्याला सांगता येईल? हल्ली म्हणे लोकांना मराठी शब्द पुरे पडत नाहीत. त्यांच्या भावना, विचार व्यक्त करण्यासाठी त्यांना इतर भाषांचा आधार घ्यावा लागतो. सुमारे ८०० वर्षांपूर्वी एका कवीने त्याच्या अंतरीच्या भावना एका प्रार्थनारूपी कवितेत व्यक्त केल्या आहेत. ह्या कवितेत साऱ्या विश्वात शांती, परस्पर प्रेम, स्वातंत्र्य, समाधान, भक्ती आणि सज्जनता नांदो अशी ईश्वराकडे विनवणी केलेली आहे. इतकी मोठी उदात्त वैश्विक विनंती करायला त्या कवीला मोजून फक्त शंभर शब्द लागले होते! कवी आहेत संत ज्ञानेश्वर आणि त्यांची कविता पसायदान! काय हा शतशब्दथरार!

ह्या पसायदानाबद्दल मी शंभर शब्दांचे काही परिच्छेद लिहिले आहेत. ते मूळ कवितेसह खाली देत आहे.

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।। (११)
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी-रती वाढो

भूतां परस्परे जडो । मैत्र जिवाचे (१२)
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो
जो जे वांछील तो तें लाहो । प्राणिजात (१४)
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां (०९)
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव
बोलते जे अर्णव । पीयूषाचे (१०)
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु (१२)
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी
भाजिजो आदिपुरुखी । अखंडित (१०)
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी (०९)
येथ म्हणे श्री विश्वेश्वराओ । हा होईल दान पसावो
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला (१३)
(११ + १२ + १४ + ०९ + १० + १२ + १० + ०९+ १३ = १०० शब्द ) ह्यातल्या पहिल्या ओळीचा विचार करूया:

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।

मला ज्ञानेश्वरांनी पहिल्या ओवीत उल्लेख केलेल्या 'वाग्यज्ञ' ह्या शब्दाचं फार कुतूहल वाटतं. त्यांनी मांडलेला हा यज्ञ फार वेगळा आहे. कोणत्याही नेहमीच्या यज्ञाच्या सुरुवातीला परमेश्वराची स्तुती केलेली असते. मग हा यज्ञ कशासाठी केला जातोय ते उद्दिष्ट सांगितलं जातं. ते मिळण्यासाठी यज्ञाच्या पवित्र आगीत काही गोष्टींचा त्याग करून त्यांची आहुती दिली जाते. आहुती दिल्यानंतर 'इदं न मम' (हे माझे नाही) असं म्हणून त्यांच्यावरचा अधिकारही सोडून दिला जातो. पण ज्ञानेश्वरांनी पसायदानाची प्रार्थना ग्रंथाच्या सुरुवातीला नाही तर शेवटी केलेली आहे. शिवाय त्यातून ओंजळ(पसा)भर प्रसाद मिळावा अशी सरळसरळ अपेक्षा व्यक्त केली आहे. असं का?

मला वाटतं की ह्या वाग्यज्ञात त्यांनी त्यांना आलेल्या व्यक्तिगत वाईट अनुभवांची आहुती दिली आहे. अन्यायाची आहुती दिली आहे. असमाधानाची आहुती दिली आहे. राग, संतापाची आहुती दिली आहे. वैषम्याची आहुती दिली आहे. नैराश्याची आहुती दिलेली आहे. स्वानुकंपेची (self pity) आहुती दिली आहे. मोह मायेची आहुती दिली आहे. अशा तऱ्हेने मन आणि बुद्धी आधी नितळ, पवित्र झाल्यावर मगच त्यांनी परमेश्वराकडे मागणं केलं म्हणूनच ते त्यांच्या मनाच्या व्यापक भूमिकेतून झालेलं आहे. त्यामुळे त्यांना स्वतःसाठी किंवा त्यांच्या कुटुंबासाठी मान-सन्मान, यश, संपदा, प्रसिद्धी नको होती. समाजमान्यता, अधिकार नको होते. त्यापेक्षा सगळ्यांच्या मनातली ही सारी 'व्यंकटी' - वेडेवाकडेपणा नष्ट होण्याचं दान मिळावं ह्यासाठी ते पार्थना करतात.

अजून एक विचार मनात असा येतो की किती कमीतकमी शब्दात आपल्याला जास्तीतजास्त अर्थ व्यक्त करता येईल? पसायदानातल्या एकूण नऊ ओव्यांपैकी खालील ओवी मला सगळ्यात जास्त आशयघन वाटते:

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचे गाव
बोलते जे अर्णव । पियुषाचे

ह्या केवळ दहा शब्दात ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांच्या वाग्यज्ञाचं फलित म्हणून ज्या एका आदर्श समाजाचं (युटोपियाचं) दान परमेश्वराकडे मागितलं आहे त्याचं फार सुंदर वर्णन केलेलं आपल्याला दिसतं. ह्या पृथ्वीवर (चला = पृथ्वी) कल्पवृक्षासम इच्छिलेले फळ देणाऱ्यांचा आवाज (आरव) येवो, साऱ्या चिंता हरण करणाऱ्या जिवंत चिंतामणींसम नररत्ने निर्माण होवोत आणि ज्यांची वाणी अमृतासम (पियुष = अमृत) जीवनदायी आणि सागरासम (अर्णव = सागर) अथांग असू दे.

ह्या ओवीतल्या शब्दांचा विचार केला की थक्क व्हायला होतं. जी सतत चालत असते ती चला - म्हणजे पृथ्वी. हे १२९० साली लिहिलेलं आहे हे लक्षात घेण्यासारखं आहे. त्या काळी काही ठिकाणी पृथ्वी एका जागी स्थिर असून सूर्य तिच्याभोवती फिरतो असा समज

होता! त्या काळी ज्ञानेश्वर महाराजांनी पृथ्वीला 'चला' म्हटलेलं आहे! आरव आणि अर्णव ह्या शब्दांनी एक अद्‌भुत अंतर्नाद साधला आहे. इंद्रलोकीच्या वृक्षाची, कल्पतरूची, सळसळ पृथ्वीवर यावी ह्यात पृथ्वीचे नंदनवन व्हावं अशी इच्छा सहजपणे व्यक्त होते. चिंताहरण करणारं चिंतामणी रत्न एक असून पुरत नाही तर त्यांचा गावच निर्माण व्हावा - म्हणजे सारा समाजच तसा असावा ही कल्पनासुद्धा अत्यंत भव्य, सुंदर आहे.

**संपादकीय टीप:** एका संस्कृत, मराठी तज्ञ प्राध्यापकांशी चर्चा करून त्यांनी मला सांगितलेल्या माहितीच्या आधारे:

प्राध्यापक अरविंद मंगळूरकर आणि मोरेश्वर केळकर (दोघेही संस्कृत, मराठी व ज्ञानेश्वरीचे अभ्यासक) यांचे "ज्ञानदेवी" खंड १-२-३, मौज प्रकाशन यामध्ये ज्ञानेश्वरीवर, पसायदानावर सविस्तर अभ्यासपूर्ण विवेचन केलं आहे. त्यानुसार पसायदानाविषयी विश्लेषणामध्ये... "चलां"– हे कल्पतरुंचे - विशेषण आहे- प्रगतीशील-गतिमान याअर्थाने! वर लेखात म्हंटले आहे तसे पृथ्वी या अर्थाने योजिले नाही. "आरव" -उपवने , "चिंतामणींचे" – सज्जनांचे ...अशा अर्थाचे आणि अजून सविस्तर विवेचन आहे. जिज्ञासू वाचकांनी "ज्ञानदेवी" खंड १-२-३ पहावेत .

-विनता कुलकर्णी (संपादक, बृहन्महाराष्ट्र वृत्त)

*******************************************